# जाहीर सूचना

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत  गट-क मधील विविध संवर्गातील पदे भरण्यासाठी दिनांक २८/२/२०२१ रोजी लेखी परिक्षा घेण्यात आली होती. या संदर्भात उमेदवारांच्या माहितीसाठी खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

(१) निवड झालेल्या उमेदवारींची समुपदेशन संबंधित विभाग प्रमुख / उपसंचालक आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ, यांचे कार्यालयात दिनांक २२ व  २३ एप्रिल २०२१ रोजी ठेवण्यात आलेले आहे.

(२) मेरिट प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना समुपदेशनासाठी उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात आलेले आहे.

(३) उमेदवारांची मेरिट लिस्ट संबंधित विभाग प्रमुख/उप संचालक आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येत आहे. तसेच सदर मेरिट लिस्ट आरोग्य विभागाच्या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करण्यात येत आहे.

(४) Tutor, Public Health Nurse, Psychiatric Nurse & Paediatric Nurse या चार संवर्गांचे निकाल प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. तथापि शासनाने या संवर्गांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये  बदल केलेला आहे.  नवीन सेवा प्रवेश नियमानुसार या संवर्गामधील पदे भरण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.  त्यामुळे या संवर्गाचे समुपदेशन दिनांक २२ व २३ एप्रिल २०२१ रोजी घेण्यात येणार नाही.  या संवर्गांचे समुपदेशनाची तारीख स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.